# Political Science Forum Report - 2022-23

With the aim of making the students of the college aware of the political concepts along with the political events and to increase their active participation in the political process of the state and from that to form the leadership of tomorrow, a political science study board was formed this year as well. The activities implemented through this study board are as follows

**1) Constitution of Study Board (dated 15 September 2022)**

Like every year, this year too, all the students who have studied Political Science were called together on 15th September 2022. The President of the meeting was Dr. Dilip Mahajan, Vice Principal of the college. In this meeting, Prof. Dr. Nagesh Gaikwad explained in detail the process of forming the Political Science Study Board through democratic means. Along with this, the duties and responsibilities of the study board were also explained. After this all the students democratically started the process of formation of Study Board and unanimously elected office bearers from their classes. Later, the office bearers from among themselves. Shital Sanjay Deshman B.A. The third year was elected as the president. Other office bearers were also selected, finally they were honored by the chairman of the meeting, Dr. Dilip Mahajan, with a rose. After that, he delivered his presidential speech and wished the newly appointed office bearers. Finally, the newly appointed president Ms. Shital Deshmane expressed his gratitude for the program.

**Political Science Board of Studies Executive Session -2022-23**

| | |
|---|---|
| 1.Mrs. Shital Sanjay Deshmane | President |
| 2.Mrs. Sandhya Santosh Youngad | Vice President |
| 3.Mrs. Rajnandini Dashrath Deshmane | Secretary |
| 4.Mrs. Kiran Suresh Ghadge | Member |
| 5.Mrs. Shraddha Sharad Salve | Member |
| 6. Suraj Ambadas Ingole | Member |
| 7.Mrs. Anjali Ganesh Jadhav | Member |
| 8.Mrs. Shital Devidas Vagh | Member |
| 9.Mrs. Tarunnam Akbar Navrangi | Member |
| 10.Mrs. Komal Suresh Ghadge | Member |
| 11.Mrs. Rituja Bhagwan Jaywal | Member |

**2) Dr. Babasaheb Ambedkar Mahaparinirvana Day (December 6, 2022)**

With the aim of making the students of the college aware of the contribution of Dr. Babasaheb Ambedkar, Chairman of the Drafting Committee of the Indian Constitution, to the constitution making, this program was organized to shed light on his life history on the occasion of Mahaparinirvana Day. Subhash Gavane was the chief guest while Prof. Manish Palve was present. Dr. Vijay Gavai (B.Com.First Year) student in these programs. came dressed as Babasaheb and remembered Babasaheb by narrating the important thoughts of Babasaheb, also students Amol Gavai (B.Com First Year) sang many songs based on Babasaheb's life in melodious voice. Along with this Ms. Dr. Ashwini Youngad and Vaibhav Wankhede (BA First Year) Babasaheb's contribution in various fields was explained to the audience with various examples. The introduction of this program Ms. If Shital Deshman did it, thank you. Tarunnam Navarangi did it. The program was successfully coordinated by Ms. Sandhya Yangad and Ms. Sheetal Wagh, a student, did it. The organizer of this program was Prof. Dr. Nagesh Gaikwad and 37 students were present for this program.








**3) Dr. Nagpur Legislature Session. Participation of Nagesh Gaikwad (Dec. 20 to 27, 2022)**

On behalf of the 'Commonwealth Parliamentary Board', Maharashtra Branch, a Parliamentary Study Class is organized every year since 1964 on the subject of 'Parliamentary Procedures and Practices' for post graduate students and professors studying

Political Science and Public Administration from the universities of the state. This year the 49th Parliamentary Session was held from 20th to 27th December 2022. Dr. along with the six students who came first in order of merit to represent our saint Gadgebaba Amravati University for this study class. Nagesh Gaikwad (Head of Department of Political Science, S.P.M. Tatyasaheb Mahajan Arts and Commerce, College, Chikhali, G. Buldhana) was selected. Six students and one professor each from a total of 12 universities in Maharashtra participated in the parliamentary study class in this session. In this class, the students were given the opportunity to sit in the seat of the Honorable MLA in the actual hall. And in the hall Hon'ble Chief Minister Shri Eknathji Shinde, Hon'ble Deputy Chief Minister Shri Devendraji Fadnavis, Assembly Speaker Hon'ble Shri Rahulji Narvekar, Legislative Council Chairman Hon'ble Dr. Lectures were also organized by Meenal Tai Gorhe as well as Hon'ble Ministers of various departments, Leaders of Opposition and outstanding parliamentarians. Along with this, water facility was also made available from the actual working gallery of the auditorium. Finally, the class was concluded by giving a certificate of participation through the Honorable Speaker of the Vidhan Sabha.








**4) National Voter's Day (25 January 2023)**

Universal adult suffrage enjoyed by the citizens of India is the main reason why democracy has survived for the last 70 years in India, the world's largest democracy. All men and women in India have got the right to vote since the promulgation of the Constitution of India. From then till today, voters in India have exercised their right to vote.






**Dr. Nagesh Gaikwad**

**Coordinator**

# राज्यशास्त्र अभ्यास मंडळ (सत्र – 2022 – 23)

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राजकीय घडामोडी सोबतच राजकीय संकल्पनांची जाणीव व्हावी व राज्यातील राजकीय प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग वाढावा आणि त्यातूनच उद्याचे नेतृत्व तयार व्हावे या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले या अभ्यास मंडळामार्फत राबविण्यात आलेले उपक्रम पुढील प्रमाणे

1) अभ्यास मंडळ गठन (दि. 15 सप्टेंबर 2022)

दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा राज्यशास्त्र अभ्यास विषय घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना दिनांक 15 सप्टेंबर 2022 रोजी एकत्रित बोलविण्यात आले या सभेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.दिलीप महाजन हे होते या सभेमध्ये सर्वप्रथम राज्यशास्त्र अभ्यास मंडळ लोकशाही मार्गाने गठन करण्याची प्रक्रिया प्रा.डॉ.नागेश गायकवाड यांनी सविस्तर समजून सांगितली सोबतच अभ्यास मंडळाची कर्तव्य व जबाबदारी सुद्धा स्पष्ट करून दिली. यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यास मंडळ गठनाच्या प्रक्रियेला लोकशाही पद्धतीने सुरुवात करून सर्वानुमते आपापल्या वर्गातून पदाधिकाऱ्यांची निवड केली. नंतर पदाधिकाऱ्यांनी आपल्या मधूनच कु. शितल संजय देशमाने बी.ए. तृतीय वर्ष यांची अध्यक्ष म्हणून निवड केली. तसेच इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी केल्या, शेवटी या सभेचे अध्यक्ष डॉ.दिलीप महाजन यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर आपले अध्यक्षीय भाषण करून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. शेवटी नवनियुक्त अध्यक्ष कु. शितल देशमाने यांनी कार्यक्रमाचे आभार मानून आपले मनोगत व्यक्त केले.

राज्यशास्त्र अभ्यास मंडळ कार्यकारिणी सत्र -**2022-23**

| | |
|---|---|
| कु. शितल संजय देशमाने | अध्यक्ष |
| कु. संध्या संतोष यंगड | उपाध्यक्ष |
| कु. राजनंदिनी दशरथ देशमाने | सचिव |
| कु. किरण सुरेश घाडगे | सभासद |
| कु. श्रद्धा शरद साळवे | सभासद |
| सुरज अंबादास इंगोले | सभासद |
| कु. अंजली गणेश जाधव | सभासद |
| कु. शितल देविदास वाघ | सभासद |
| कु. तरुण्णम अकबर नवरंगी | सभासद |
| कु. कोमल सुरेश घाडगे | सभासद |
| कु. ऋतुजा भगवान जैवाळ | सभासद |

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन (दि.6 डिसेंबर 2022)

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भारतीय घटनेतील मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीतील योगदान माहिती व्हावे या उद्देशाने महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या जीवन चरित्रावर विविध माध्यमातून प्रकाश टाकसाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता, या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. मनीष पालवे हे उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये विजय गवई (बी.कॉम.फर्स्ट इयर) हा विद्यार्थी डॉ. बाबासाहेबांच्या वेशभूषेमध्ये आला होता आणि त्याने बाबासाहेबांनी सांगितलेल्या विचारातील महत्त्वाचे विचार सांगून बाबासाहेबांची आठवण करून दिली, तसेच अमोल गवई (बी.कॉम फर्स्ट इयर) या विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित सुमधुर आवाजात अनेक गीत गायन केली. यासोबतच कु. अश्विनी यंगड व वैभव वानखेडे (बी.ए. फर्स्ट इयर) यांनी डॉ. बाबासाहेबांचे विविध क्षेत्रातील योगदान विविध उदाहरणासह श्रोत्यांना पटवून सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. शितल देशमाने हिने केले, तर आभार कु. तरुण्णम नवरंगी हिने केले. कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन कु. संध्या यंगड व कु. शीतल वाघ या विद्यार्थिनींनी केले. या कार्यक्रमाचे आयोजक प्रा डॉ नागेश गायकवाड हे होते तर या कार्यक्रमासाठी 37 विद्यार्थी उपस्थित होते.

3) नागपूर विधिमंडळ अधिवेशनात डॉ. नागेश गायकवाड यांचा सहभाग (दि. 20 ते 27 डिसेंबर 2022)

'राष्ट्रकुल संसदीय मंडळ' महाराष्ट्र शाखेच्या वतीने 1964 पासून दरवर्षी राज्यातील विद्यापीठामधून राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयांच्या अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी 'संसदीय कार्यप्रणाली व प्रथा' या विषयाबाबत एक संसदीय अभ्यास वर्ग आयोजित करण्यात येतो. यावर्षी 49 वा संसदीय अभ्यासवर्ग दिनांक 20 ते 27 डिसेंबर 2022 या दरम्यान आयोजित केला होता. या अभ्यास वर्गासाठी आपल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी गुणानुक्रमे प्रथम आलेल्या सहा विद्यार्थ्यांसोबत डॉ. नागेश गायकवाड (राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शि.प्र.म. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य, महाविद्यालय, चिखली, जी. बुलढाणा) यांची निवड झाली होती. या अधिवेशनामधील संसदीय अभ्यास वर्गामध्ये महाराष्ट्रातील एकूण 12 विद्यापीठामधून प्रत्येकी सहा विद्यार्थी व एक प्राध्यापक सहभागी झाले होते. या वर्गात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सभागृहात माननीय आमदार महोदय यांच्या जागेवर बसण्याची संधी उपलब्ध करून दिली होती. व सभागृहात माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे, माननीय उपमुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस, विधानसभा अध्यक्ष माननीय श्री राहुलजी नार्वेकर, विधानपरिषद सभापती माननीय डॉ. मीनल ताई गोऱ्हे तसेच विविध खात्यातील माननीय मंत्री महोदय, विरोधी पक्षनेते तथा उत्कृष्ट संसद पटू यांचे व्याख्याने सुद्धा आयोजित केली होती. सोबतच सभागृहाचे प्रत्यक्ष कामकाज गॅलरीतून पाण्याची संधी सुद्धा उपलब्ध करून देण्यात आली होती. शेवटी माननीय विधानसभा अध्यक्षांमार्फत सहभागाचे प्रमाणपत्र देऊन या वर्गाचा समारोप करण्यात आला.

4) राष्ट्रीय मतदार दिन (दि. 25 जानेवारी 2023)

जगातील सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या भारतात गेल्या 70 वर्षापासून लोकशाही टिकून असण्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील नागरिकांना असणारा सार्वत्रिक प्रौढ मताधिकार हे आहे. भारतातल्या सर्व स्त्री-पुरुषांना भारतीय राज्यघटना लागू झाल्यापासून मतदानाचा अधिकार मिळालेला आहे. तेव्हापासून आजपर्यंत भारतातील मतदारांनी मतदान अधिकाराच्या माध्यमातून भारतीय लोकशाहीत अनेक सरकारे निवडून दिले आहेत. आणि लोकशाहीत आपला सहभाग नोंदवलेला आहे. परंतु तरीही आजच्या स्थितीत मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांची उदासीनता असल्याचे मतदारांनी केलेल्या प्रत्यक्ष मतदान टक्केवारीतून दिसून येते. म्हणूनच प्रत्यक्ष मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी निवडणूक आयोगामार्फत निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस 25 जानेवारी हा 'मतदार दिन' म्हणून साजरा केला जातो. आपल्या महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागामार्फत 25 जानेवारी 2023 हा दिवस मतदार दिवस म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये प्रा डॉ.नागेश गायकवाड, यांनी विद्यार्थ्यांना मतदारांसाठी असलेली शपथ देऊन, मतदाराच्या कर्तव्या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे हे होते तर मंचावर डॉ. बाळकृष्ण इंगळे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र अभ्यास मंडळाची अध्यक्षा कु. शितल देशमाने हिने केले, तर आभार कु. श्रद्धा साळवे हिने मानले असून या कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन कु. किरण घाडगे हिने केले आहे. या कार्यक्रमासाठी एकूण 73 विद्यार्थी उपस्थित होते.

5)'संविधानातील मूलभूत कर्तव्यावर' कार्यशाळा संपन्न (दि.19 एप्रिल 2023)

शि.प्र.मं. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयातील, राज्यशास्त्र विभागामार्फत 'संविधानातील मूलभूत कर्तव्य' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.विलास टाले (सदस्य, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती) हे होते. प्रथमतः त्यांची नुकतीच सं.गा.बा.अ. विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अभ्यास मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी भारतीय संविधानात 1976 ला 42 व्या घटनादुरुस्तीने अंतर्भूत केलेल्या मूलभूत कर्तव्यांबद्दल माहिती देताना, भारतीय नागरिकांनी जागृत राहून त्याचे पालन आपण किती सहजपणे करू शकतो, याचे दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन पटवून सांगितले. सोबतच अधिकार हवे असतील तर आपण मूलभूत कर्तव्यांचे सुद्धा पालन करणे, भारताला जागतिक नेतृत्व करण्यासाठी तेवढेच आवश्यक असल्याचे आवर्जून सांगितले. या कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात आपण आपल्या घरची छोटी छोटी कर्तव्य पालन करण्याची सवय लावली, तर आपण राष्ट्राप्रती असणारी आपली कर्तव्ये सहजपणे पालन करून, आपल्या जीवनामध्ये यश संपादन करू शकतो. शेवटी या कार्यशाळेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी मार्गदर्शकांना प्रश्न विचारून आपल्या शंकांचे समाधान करून घेतले. या कार्यशाळेचे

आयोजन तथा प्रस्ताविक डॉ नागेश गायकवाड यांनी केले, तर आभार राज्यशास्त्र अभ्यास मंडळाची अध्यक्षा कु. शितल संजय देशमाने हिने मानले. या कार्यशाळेचे यशस्वी सूत्रसंचालन कु. संध्या यंगड हिने केले. तर या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू, कर्मचारी तथा सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.